# रेड झाली हो

सुटकेच्या नावाखाली वेश्यांचे शोषण

अभ्यासाचा निष्कर्ष : वेश्यांच्या सुटकेचे
सर्व प्रयत्न निरर्थक



| | | |
|---|---|---|
| रेखाटन | : | **अमुदा मीना वसंत,** सांगली |
| डिझाईन आणि रचना | : | **महावीर विभुते,** कोल्हापूर<br>vmahavir@gmail.com |
| प्रकाशक | : | **संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम),** भारत |

सदरचे प्रकाशन यांचे सहकार्याने प्रकाशित -
**अमेरिकन ज्युईश वर्ल्ड सर्व्हीस, फंड फॉर ग्लोबल ह्युमन राईटस्, ह्युमन कपॅबिलीटी फौंडेशन, लीवाई स्ट्रॉस फौंडेशन, राईटस् फॉर चेंज, साऊथ एशिया वुमेन्स फंड.**



© **SANGRAM,** India, March 2018



ई-मेल : info@sangram.org




## गोषवारा

मानवी वाहतूक विरोधी उपाययोजनांवरील चर्चा ही अनेकदा 'वेश्याव्यवसाय म्हणजे महिलांवरील हिंसा व गुलामीचे स्वरूप' असण्याविषयीच्या वादविवादांमुळे झाकोळली जाते; शिवाय बालकांवरील लैंगिक अत्याचारांशी जोडल्यामुळे ती अधिक डागाळली जाते. मानवी वाहतूक व लैंगिक काम यांचे एकत्रीकरण होण्यास मानवी वाहतूकविरोधी उपाययोजना सर्वाधिक जबाबदार आहेत, ज्यामध्ये 'लैंगिक काम म्हणजेच हिंसा' अशी सरसकट संकल्पना वापरली जाते आणि लैंगिक कामगारांच्या व वाहतूक झालेल्या व्यक्तींच्या मानवी हक्कांची पायमल्ली दुर्लक्षितच राहते. यामुळे मानवी-वाहतूक-विरोधी संघटना एकीकडे व लैंगिक कामगारांच्या हक्कांकरिता काम करणाऱ्या संघटना दुसरीकडे अशी दुफळी निर्माण झाली आहे. या दुफळीमुळे लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींचे हक्क संरक्षित करणाऱ्या धोरणांऐवजी लैंगिक काम नष्ट करण्याचा पुरस्कार करणारी धोरणेच निर्माण केली जात आहेत. तसेच अशा प्रकारच्या मानवी-वाहतूक-विरोधी मांडणीमध्ये लाखो स्थलांतरित महिलांच्या अनुभवांना शून्य किंमत दिली जाते वते रद्दबातल ठरतात. नैतिकता आणि संस्कृती यांवरील संकुचित चर्चांमुळे सुरक्षित स्थलांतर व उपजीविका निवडण्याचा हक्क या बाबी डावलल्या जातात.

सदर संशोधनातून लैंगिक कामांतील धाडींमध्ये धरपकड केल्या गेलेल्या, सोडवणूक केलेल्या व त्यातून पुनर्वसित केल्या गेलेल्या महिलांचे अनुभवविश्व समोर आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. महिलांची लैंगिक कामांकरिता केली जाणारी वाहतूक थांबविण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या रणनीती विषयीची सांख्यिक माहिती व त्यासोबत महिलांचे प्रत्यक्ष अनुभव हे आम्ही तपासून पहिले. हे संशोधन कायदे व धोरणांचा लैंगिक कामगारांच्या आयुष्यावर होणारा परिणाम उलगडून दाखवते. धाडींमध्ये "सोडवणूक" केल्या गेलेल्या, विविध कालमर्यादेकरिता "पुनर्वसित" झालेल्या व आता पुन्हा लैंगिक कामात शिरलेल्या महिलांच्या अनुभवांवर आम्ही हे संशोधन केंद्रित केले आहे. ही गुंतागुंतीचे अनुभवकथने मानवी वाहतूक व लैंगिक कामात राहण्याचा निर्णय यांच्यातील सहसंबंध कसा अरेषीय आहे हे दाखवून देते.

## पार्श्वभूमी

भारताने अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय करार व जाहीरनाम्यांचा अंगीकार केला असून त्यांच्या अंमलबजावणी विषयक अहवाल वेळोवेळी सादर केले आहेत. अलीकडच्या काही वर्षांमध्ये लैंगिक कामगार व चळवळीतील कार्यकर्ते, करार समित्यांना पाठवल्या जाणाऱ्या अहवालांच्या निर्मिती प्रक्रियेशी जोडून घेऊन त्यामध्ये देशातील लैंगिक कामाविषयक होणाऱ्या मांडणीमधील मानवी अधिकारांची संदर्भचौकट अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राष्ट्रीय व जागतिक पातळीवर मूळ धरू लागलेल्या हक्कांविषयीच्या वैचारिक मांडणीचा युक्तिवाद असा आहे की लैंगिक कामगारांच्या हक्कांचा आदर, संरक्षण, पूर्तताव समर्थन होण्याकरता केले जाणारे प्रयत्न हे त्यांना नागरिक म्हणून राज्यघटनेने दिलेले हक्क प्राप्त होण्याच्या दृष्टीने केले गेले पाहिजेत. परंतु, लैंगिक कामगारांचे संकोचीकरण, दुर्बलीकरण व त्यांचे मानवी हक्क ओळखण्यामध्ये भारत अपयशी ठरलेला आहे. भारतातील मानवी वाहतूक विरोधी धोरणे, विशेषतः अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा १९५६(ITPA), मानवी वाहतूक व लैंगिक कामाचे एकत्रीकरण करतात, वाहतूक झालेल्या व्यक्तींचे संरक्षण करण्यास असमर्थ ठरतात व पर्यायाने लैगिक कामगारांवर होणाऱ्या हिंसेमध्ये वाढ होण्यास कारणीभूत ठरतात.

यातील विरोधाभास असा, की जरी स्वातंत्र्यानंतरच्या दशकापासूनच ITPA अमलात आणला गेला असला तरीही २०१३ पर्यंत कोणत्याही भारतीय कायद्यामध्ये मानवी वाहतूकी अंतर्गत नक्की कोणकोणत्या बाबींचा समावेश होऊ शकतो याची अचूकपणे व्याख्या केली गेली नव्हती. ITPA च्या अंमलबजावणीमुळे लैंगिक कामगारांच्या आयुष्यावर अनेक परिणाम होतात, जसे:कामाचे गुन्हेगारीकरण, कुटुंबाचे व मुले वाढविण्याच्या हक्काचे गुन्हेगारीकरण, खाजगीपणाच्या हक्काचे उल्लंघन, घरांमधून किंवा अन्य ठिकाणांमधून अन्यायपूर्ण व बळजबरीने केलेले उच्चाटन व प्रौढ व्यक्तीच्या संमतीच्या अधिकाराची पायमल्ली. मानवी वाहतुकीच्या कायद्यांमधील शब्दशः तरतुदी, त्यांचे प्रकरणे हाताळताना लावले गेलेले अन्वयार्थ, व न्यायाधीशांच्या वैयक्तिक समजेनुसार दिले गेलेले प्रकरणांचे निकाल, यातील तफावतींचे विश्लेषण सदर संशोधनात केले गेले आहे.

## **अभ्यास**

सदर संशोधन हे मानवी हक्क कार्यकर्ते, मानवी हक्क संशोधन संस्था व लैंगिक कामगार संघटना यांच्यातील भागीदारीचे फलित होते. भारतातून वेश्या अन्याय मुक्ती परिषद (VAMP) ही लैंगिक कामगारांची संघटना, संग्राम (SANGRAM) ही संस्था व नेदरलंड स्थित Rights4change या संस्था संशोधनाच्या अंमलबजावणीच्या अग्रभागी होत्या. भारतामध्ये, महाराष्ट्रातील वेश्या अन्याय मुक्ती परिषद, सहेली एचआयव्ही/एड्स कार्यकर्ता संघ, आधार बहुद्देशीय संस्था, कर्नाटकातील उत्तर कर्नाटका महिला ओक्कूटा, केरळमधील केरला नेटवर्क ऑफ सेक्सवर्कर्स, व झारखंडमधील सृजन फौंडेशन या संस्थांची या अभ्यासात भागीदारी होती. या अभ्यासाची उद्दिष्टे अशी:

- आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांचे संदर्भ भारतातील लैंगिक कामगारांना कसे लागू करता येतील हे समजून घेणे
- लैंगिक कामगारांना मानवी हक्कांचे संदर्भ समजून घेण्यास व माहिती संकलन व विश्लेषणामध्ये अर्थपूर्ण रीतीने सहभागी होण्यास साहाय्य करणे
- नागरिकांना राज्यघटनेने बहाल केलेले हक्क व लैंगिक कामगारांच्या जीवनातील त्यांची प्रत्यक्ष उपलब्धता यांच्यातील तफावती समजून घेणे
- लैंगिक कामगारांना येणाऱ्या हिंसक व उल्लंघनात्मक अनुभवांचे संकलन करणे
- धाड व सोडवणूक तंत्रांचा लैंगिक कामगारांच्या जीवनावर होणारा परिणाम नोंदवणे व त्याचे विश्लेषण करणे
- वस्तीसमूहातील अनुभवकथानांद्वारे, मानवी वाहतूक विरोधी कायदे व धोरणे प्रौढ व संमती असलेल्या लैंगिक कामगारांना कशा प्रकारे लागू केले जातात याचे विश्लेषण करणे

## संशोधन

VAMP व संग्राम यांनी संशोधनाची संदर्भचौकट निश्चित करून महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ व झारखंड या अभ्यासस्थळांतील लैंगिक कामगार संघटनांमधून संशोधन चमूची निवड केली. जून २०१५ मध्ये घेतलेल्या “मानवी वाहतूक विरोधी कायद्यांचा लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांवर होणारा परिणाम तपासणे” या प्रशिक्षण कार्यशाळेतून सैद्धांतिक बैठक निर्माण केली गेली होती. “समूह संशोधन मार्गदर्शिका” निर्माण करून त्यामध्ये संशोधनाच्या पद्धतींचे गठन करण्यात आले व ते समूह पातळीवरील संशोधकांना समजावण्यात आले.

या अभ्यासात, मानवी वाहतूक विरोधी कायद्यांचामानवी हक्कांवर होणारा परिणाम शोधण्याकरिता व तपासण्याकरिता तसेच शासनव्यवस्थेच्या मानवी हक्कांचे पालन करण्याच्या बांधिलकीशी या परिणामांची तुलना करण्याकरिता व त्यातून समोर आलेले निष्कर्ष वापरून हक्काधारित व परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे धोरणात्मक बदलांसाठी अधिक परिणामकारक समर्थन करण्याकरिता निर्माण केलेले एक साधन-दि राईट गाईड (The RighT Guide)चा वापर केला गेला आहे. राईट गाईड चा मराठी व हिंदीमध्ये अनुवाद केला असून त्याची निर्मिती पुढील तत्वांवर आधारित आहे : शासनव्यवस्थेचे उत्तरदायित्व, ज्ञान व पुराव्यांवर आधारित कृती, सहभाग व चळवळींमधील सेतुबांधणी व गटबंधन.

हा अभ्यास चार ही राज्यांमध्ये प्राथमिक स्त्रोत वापरून केला गेला, ज्यामध्ये केंद्रित गटचर्चा (१४ गटांमध्ये १५६ सहभागी), सर्व्हे (२४३ सहभागी) व मुलाखती (२३), यांचा समावेश होता. दुय्यम स्त्रोतांमध्ये न्यायालयीन निकालांच्या छायाप्रती, कायदे व करारांचे दस्तावेज, व भारताकडून संयुक्त राष्ट्रसंघातील समित्यांना पाठवले गेलेले अहवाल यांचा समावेश होता. भारतीय दंडविधाना खालील ITPA अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांच्या निकालांव्यतिरिक्त, बाल न्याय कायदा व अन्य कायद्यांचेही विश्लेषण करण्यात आले. माहिती मिळविण्याकरिता माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जांचाही वापर करण्यात आला.

या संशोधनामध्ये निरनिराळ्या ठिकाणांमधून काम करणाऱ्या लैंगिक कामगारांच्या आयुष्यावर होणारे मानवी-वाहतूक-विरोधी कायद्यांचे परिणाम अभ्यासण्यात आले : ग्रामीण व शहरी, रस्त्यावरील, वेश्यागृहांमधील, लॉजमध्ये काम करणाऱ्या लैंगिक कामगार, तसेच “छुप्या” लैंगिक कामगार ज्या उघडपणे व्यवसाय करीत नाहीत.संशोधनातील सहभागींची निवड या निकषांनुसार केली गेली. जिथे लैंगिक कामगारांच्या संघटना कृतीशील आहेत अशा भागांची संशोधनाकरिता निवड केली गेली ज्यायोगे संशोधन काळानंतरही त्यातील निष्कर्षांचा वापर त्या आपल्या समर्थनात्मक मोहिमांची धोरणे ठरविण्याकरिता करू शकतील. प्राथमिक निष्कर्षांची ग्राह्यता संशोधनकर्त्या व भागीदार संघटनांच्या सदस्यांमध्ये झालेल्या बैठकीत मांडणी करून ठरविण्यात आली. बैठकीतीलसूचना व शिफारशींवर चर्चा करून त्यांचा समावेश संशोधनामध्ये करण्यात आला.

२००५ ते २०१७ या कालावधीमध्ये धरपकड करण्यात आलेल्या कोल्हापूर, जळगाव, पुणे व सांगली या महाराष्ट्रातील ४ शहरांमधील २४३ महिलांकडून मुलाखती, गटचर्चा, गृहभेटी व सुरक्षागृहांतील भेटींच्या माध्यमातून माहिती संकलित केली गेली.

संशोधनाचा पुढील टप्पा, सुरक्षागृहातून सोडलेल्या/सुटका झालेल्या/पळून गेलेल्या महिलांचा मागोवा घेऊन, स्वेच्छेने लैंगिक कामात असलेल्या महिला, धाडींमध्ये “सोडवणूक” करण्यात आलेल्या, विविध कालावधींमध्ये

पुनर्वसन केले गेलेल्या महिला व सुरक्षागृहांमधून सुटका झाल्यानंतर त्यांनी केलेली उपजीविकेची निवड, यासंबंधीच्या त्यांच्या अनुभवावर केंद्रित होता.

लैंगिक कामगारांच्या संघटना, वेश्यागृहांमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व समूहस्थित संस्थांनी धाडींविषयक माहिती गोळा करून त्यात धरपकड झालेल्या महिलांचा माग काढला. पुण्यामध्ये, समूहस्थित संशोधकांनी धाडींमध्ये पकडल्या गेलेल्या व सुरक्षागृहांतून बाहेर पडलेल्या महिलांशी चर्चा केली. सुरक्षागृहात दाखल केलेल्या महिलांचा सध्याचा ठावठिकाणा शोधण्याकरिता त्यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जदेखील दाखल केले व या महिलांच्या सुरक्षागृहात जाऊन भेटी घेतल्या.समूहस्थित संशोधकांनीत्या त्या भागातील धाडींमध्ये पकडण्यात आलेल्या महिलांशी केंद्रित गटचर्चा व वैयक्तिक मुलाखतींद्वारे संवाद साधला.

अतिशय संवेदनशीलतेने माहिती संकलित करण्यात आली कारण यातील अनेक महिलांनी न्यायालयामध्ये किंवा सोडवणूक करणाऱ्या संस्थांसमोर सुटकापूर्व अट म्हणून लैंगिक कामातून बाहेर पडण्याचीलेखी शपथपत्रे दिली होती. त्यांच्याविषयी गोपनीयता राखण्याची काळजी घेतली गेली व काही सहभागींची खरी ओळख गुप्त ठेवण्यात आली.

## निष्कर्ष

काही कळीच्या प्रश्नांची उत्तरे मिळावी म्हणून आवश्यक असलेला पुरावा गोळा करण्याकरिता हा अभ्यास केला गेला. जर महिला बळजबरीने लैंगिक कामात ढकलल्या जात असतील तर सुटका झाल्यानंतर त्या पुन्हा त्याच कामात का येतात? जर अन्य कोणतीही कौशल्ये नाहीत म्हणून त्या या कामात येत असतील तर अन्य प्रकारे उपजीविका मिळविण्याची कौशल्ये शिकविल्यानंतर देखील त्या या कामात का येतात? जर परिस्थितीसमोर नाईलाज असल्याने त्या या कामात येत असतील तर ती परिस्थिती सुधारल्यावर देखील त्या या कामात परत का येतात? जर त्या फसविल्या गेल्याने किंवा दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांच्या लबाडीमुळे किंवा विश्वासघातामुळे या कामात आणल्या गेल्या असतील तर "नवीन" आयुष्य जगण्याची संधी दिल्यानंतर देखील त्या या कामात परत का येतात? जर त्या अन्य पर्याय नसल्यामुळे या कामात आल्या असतील तर त्या त्याच कामात परत येण्याच्या पर्यायाची "निवड" का करतात?

संशोधनातील निष्कर्षांचा गोषवारा खालीलप्रमाणे :

**नैतिकताखोर व बेताल कायदे**

- या समस्येच्या मुळाशी 'अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) कायदा' ITPA हा कायदाच आहे, ज्याच्या नावातच महिलांची 'अनैतिकता' व 'वाहतूक' या संकल्पनांचे एकत्रीकरण केले गेले आहे, ज्याचा प्रत्यक्षात लैंगिक कामगार विरोधी दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावला जातो.
- भारतीय उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालयांतील २०१० – २०१७ या कालावधीतील प्रकरणांच्या विश्लेषणातून दाखल झालेल्या प्रकरणांच्या संख्येत वाढ झालेली आढळते, ज्यातून लैंगिक काम नष्ट करण्याचा पुरस्कार करणाऱ्या संघटनांनी आपल्या रणनीती मध्ये कायदेशीर प्रक्रियेचा आधार घेण्याचा अवलंब केला असण्याची शक्यता दिसून येते.

- न्यायालयांचे आदेश, निकाल, अन्वयार्थ लावण्याची पद्धत, यासह एकंदरीतच कायदेशीर यंत्रणांच्या कामकाजामध्ये लैंगिक कामाविषयी नैतिक नापसंतीच्या छटा दिसून येतात, ज्यामुळे सज्ञान महिलांचे बालकीकरण करून त्या आपल्या कुटुंबाच्या छायेतच सुरक्षित राहू शकतील असे मानले जाते, लैंगिक कामगारांच्या मिळकतीवर पोट भरणे बेकायदेशीर ठरवून उपजीविका मिळविणाऱ्यांचे गुन्हेगारीकरण केले जाते, व लैंगिक कामगारांची उपजीविकाच नव्हे, तर वेश्यागृह चालक किंवा गिऱ्हाईक मिळवून देणारे दलाल यांचेही गुन्हेगारीकरण करून त्यांचे सुरक्षा जाळेदेखील काढून घेतले जाते.
- कायदा अंमलबजावणी यंत्रणा लैंगिक कामगारांच्या विरोधातच झुकलेल्या असतात व अनेकदा हिंसा, अटक, दंड व पिळवणूकीचे समर्थन करण्याकरिता पोलिसदेखील कायद्याचाच आधार घेतात आणि कायदाव्यवस्थेकडून तर कोणतीच आशा बाळगता येत नाही.

**धाडी व त्यांचे परिणाम**

- धाडी घालताना पोलिसांचे बेताल वर्तन, लैंगिक कामगारांच्या, तसेच वेश्यागृह मानल्या गेलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या इतरांच्या हक्कांचा अनादर, हे नित्याचे होते
- धाडीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सोडवणूक करण्यात येणाऱ्या संभाव्य बळीला अत्यंत बेपर्वाईने वागविले जाते. धाडीमध्ये अपमान, शाब्दिक व शारीरिक अत्याचारांचा वापर नित्याचा असतो
- प्रसारमाध्यमांचा गैरवापर व खाजगीपणाचे उल्लंघन, महिलांचे खच्चीकरण करण्याकरिता व धाडींविषयी सनसनाटी बातम्या पुरविण्याकरीता पोलीस व प्रसारमाध्यमांचे संगनमत
- धाडींपासून किंवा पोलिसांच्या त्रासापासून सुरक्षा मिळावी याकरिता पोलिसांची लैंगिक बळजबरी व लैंगिक कामगारांकडून पैसा उकळणे
- निरोध बाळगणाऱ्या लैंगिक कामगारांना अटक करण्याकरिता कायद्यांचा बेताल वापर केल्याने एचआयव्हीच्या प्रतिबंधात्मक कामावर विपरीत परिणाम होतो, तसेच पकडलेल्या लैंगिक कामगारांची बळजबरीने एचआयव्ही चाचणी करणे बेकायदेशीर असते व चाचणीचा निकाल जाहीर करणेदेखील बेकायदेशीर असते
- पोलीस ज्या स्वैर पद्धतीने लैंगिक कामगारांवर हिंसा करतात ते पाहून सामान्य जनतेला देखील तसेच करण्याची मुभा मिळते
- पोलिसांचे अत्याचार सार्वत्रिक असतात, अटकेत असताना कधी बळजबरीने कामे करून घेण्यात तर कधी शारीरिक छळ करण्यात
- लैंगिक कामगारांची पद्धतशीरपणे मानहानी करण्याचे काम न्यायालयात देखील सुरूच राहते. प्रत्यक्ष कायदेशीर प्रक्रिया सुरु होण्याआधीच अटकेत असलेल्या महिलांना गुन्हेगाराप्रमाणे वागविले जाते व त्याकरिता कोणाकडेही दाद मागण्याची सोय नसते. अनेकदा खोटे प्रकरण असले तरीही त्यांना त्यांच्या ‘गुन्ह्याची कबुली’ देण्यास भाग पाडले जाते.

**सोडवणूक: अधिक चांगल्या आयुष्याचे मिथक**

- लैंगिक कामातून 'सोडवणूक' केलेल्या महिलांना अनेकदा सुरक्षागृहांमध्ये लैंगिक सेवा देण्याची जबरदस्ती केली जाते व अशा प्रकारे त्या 'पुनर्वसनाच्या बळी' ठरतात
- झपाट्याने वाढणाऱ्या कॉर्पोरेट अर्थव्यवस्थेमध्ये 'कौशल्य विकास' निरुपयोगी ठरतो कारण पापड, लोणची बनविणे, शिवणकाम करणे ही कौशल्ये आर्थिकदृष्ट्या शाश्वत ठरत नाहीत
- न्यायालयीन कामकाजाची पद्धत लैंगिक कामगारांच्या पूर्णपणे विरोधात जाते, व त्यांना स्वतःची सुटका करून घेण्याकरिता मोठ्या रकमा चढ्या व्याजदराने कर्जाऊ घ्याव्या लागतात
- सुटका झाल्यानंतर लैंगिक कामगारांच्या डोक्यावर कर्जाचा मोठा डोंगर साठतो कारण अटक झालेल्या कालावधीत त्यांचे उत्पन्न बुडालेले असते. त्यामुळे अनेकदा त्यांना वेठबिगारी पद्धतीने किंवा अन्य शोषणात्मकपद्धतीने काम करावे लागते. महिलांची शोषणापासून सुटका करण्याकरिता निर्माण केलेल्या व्यवस्थेमधील हा विरोधाभास आहे.
- सुटकेनंतर लैंगिक कामगार अधिक दुबळ्या बनतात व पूर्णपणे वेश्यागृह चालकांच्या ताब्यात जातात ज्यांनी पुढील धाडी रोखण्याकरिता पोलिसांना मोठ्या रकमा चारलेल्या असतात. त्यांचे येणेजाणे व नियमित आरोग्य चाचणी करणे देखील नियंत्रित होते.

संघटनांद्वारेअवैध मानवी वाहतुकीचा सामना करणे

- लैंगिक कामगारांच्या संघटनांनी महिला व मुलींची लैंगिक कामात होणारी वाहतूक रोखण्याकरिता परिणामकारक रणनीती आखली आहे.

धाडींमध्ये धरपकड झालेल्या व नंतर सुटका झालेल्या महिलांची लैंगिक कामात परत येण्याची टक्केवारी अतिशय मोठी असलेली आढळली. परतणाऱ्यांमध्ये पूर्वी वाहतूक होऊन लैंगिक कामात आलेल्या तसेच स्वेच्छेने लैंगिक कामात आलेल्या, अशा दोन्ही प्रकारांचा समावेश होता. धाडी व सुटकेनंतर पुन्हा लैंगिक कामात येणाऱ्यांनी स्वतःकरिता मोठा धोका पत्करला होता, कारण आपण लैंगिक काम सोडून देऊ अशी लेखी शपथपत्रे त्यांनी सही करून दिलेली होती.

ही आकडेवारी आपल्याला काय सांगते आणि यामागील महिलांचे म्हणणे ऐकून घेण्याची आपली तयारी आहे का?

१. धाडीच्या वेळी **०.८२% महिला (२४३पैकी २) अज्ञान होत्या** तर बाकी सर्व सज्ञान होत्या
२. **७९% (२४३ पैकी १९३)** महिलांनी सांगितले की धाडीच्या वेळी त्या **लैंगिक काम स्वेच्छेने करीत होत्या** व 'सुटका' करून घेण्याची त्यांना इच्छा नव्हती
३. **वाहतूक झालेल्यांपैकी ३६% (३६ पैकी १३)**महिला सध्या लैंगिक काम करीत होत्या व **त्यांना तेच सुरु ठेवायचे आहे** असे त्यांनी सांगितले
**४.** सुटका झालेल्या **७७% (२१८ पैकी १६८)** महिला **लैंगिक कामामध्ये परत आल्या**

## शेवट: प्रमुख मुद्दे

धाडी घालणाऱ्या किंवा प्रवृत्त करणाऱ्या पोलीस, स्वयंसेवी संस्था किंवा इतरांना धाडीमध्ये सापडणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाच्या गुंतागुंतीच्या आलेखाविषयी बहुतेकदा कोणतीही संवेदनशीलता नसते. 'बळी जाण्याच्या' संकल्पनेचा प्रचंड प्रभाव या संपूर्ण व्यवहारामध्ये असतो व तथाकथित 'सोडवणूक' केली जाणाऱ्या व्यक्तीच्या म्हणण्याकडे संपूर्णपणे कानाडोळा केला जातो. धाडींचे समर्थन करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या युक्तिवादाच्या – अर्थात अज्ञान व्यक्तीलैंगिक कामात असण्याच्या – पूर्ण विरोधी माहिती संशोधनात आढळून आली ज्यात धाडींमध्ये सापडलेल्या अज्ञान व्यक्तींची टक्केवारी अत्यल्प होती. याव्यतिरिक्त, संशोधनात असे दिसून आले की धाडींमध्ये पकडलेल्या व नंतर सुटका झालेल्या लैंगिक कामगारांपैकी लैंगिक कामात परत आलेल्यांची टक्केवारी खूप मोठी आहे. परतणाऱ्यांमध्ये पूर्वी वाहतूक होऊन लैंगिक कामात आलेल्या तसेच स्वेच्छेने लैंगिक कामात आलेल्या, अशा दोन्ही प्रकारांचा समावेश होता. धाडी व सुटकेनंतर पुन्हा लैंगिक कामात येणाऱ्यांनी स्वतःकरिता मोठा धोका पत्करला होता, कारण आपण लैंगिक काम सोडून देऊ अशी लेखी शपथपत्रे त्यांनी सही करून दिलेली होती.

संशोधनामधून मिळणाऱ्या पुराव्यावरून हे निर्देशित होते की धाडी व पुनर्वसनाचे कार्य हे अत्यंत बेछुटपणे, हिंसक पद्धतीने व त्या समूहाकरिता अत्यंत घातक ठरेल अशा पद्धतीने केले जाते एवढेच नव्हे तर लैंगिक कामात अज्ञान व बळजबरीने आलेल्या सज्ञानांची समस्या सोडविण्यामध्ये देखील ते पूर्णपणे अपयशी ठरते. पोलीस धाडीच्या अनेक पिढ्या देखील अवैध मानवी वाहतुकीचा प्रश्न सोडवू शकलेल्या नाहीत.

या अंधाऱ्या विवराच्या शेवटी एकच लुकलुकणारा प्रकाश म्हणजे सतर्क लैंगिक कामगारांच्या संघटना, ज्या स्वतःच्या, तसेच लैंगिक कामात वाहतूक झालेल्या अज्ञान व सज्ञानांच्या आयुष्यातीलही ,हिंसा व अत्याचारांचे उच्चाटन करण्याकरिता स्वतःला संघटीत करीत आहेत. कोणत्याही समूहामध्ये, शोषण करणाऱ्या व सुरक्षेऐवजी हिंसा करणाऱ्या पोलीसांसारख्या 'बाहय' यंत्रणेकडून सोडवणुकीचे कार्य होऊ शकते, ही संकल्पनाच या समस्येला अधिक गंभीर बनविते.

त्या समूहातील लैंगिक कामगार किंवा वेश्यागृहचालकांच्या सहभागाशिवाय केलेले धाड व सोडवणुकीचे कोणतेही कार्य हे तेथील लैंगिक कामात जबरदस्तीने आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ शकत नाही. कदाचित या चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या महिलांचे आवाज अधिक जोरदारपणे बाहेर येऊ शकले तरच याविषयी अधिक खात्री पटू शकेल.